असुधारित प्रत

# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१४

## (सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत)

**(बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रस्ताव) - चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर -**

**सर्वश्री. माणिकराव ठाकरे,** सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, धनंजय मुंडे, शरद रणपिसे, राजेंद्र मुळक, चंद्रकांत रघुवंशी, अमरसिंह पंडित, आनंदराव पाटील, रामहरी रुपनवर, अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"यंदा राज्यामध्ये अल्पप्रमाणात पाऊस पडल्याने सन १९७२ पेक्षाही भीषण दुष्काळ पडलेला आहे, त्यामुळे गेल्या तीन महिन्यात २०० च्या वर शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, दररोज किमान २ शेतकरी आत्महत्या करीत असणे, ४८ तासात तब्बल २० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची दु:खद घटना दिनांक १ डिसेंबर, २०१४ रोजी निदर्शनास येणे, अकोला जिल्ह्यातील बाळापूर येथील ७५ वर्षीय काशिनाथ इंदोरे या शेतकऱ्यांनी स्वत:ची चिता रचून आत्महत्या केली, नांदेड जिल्ह्यातील ३२ वर्षीय युवा शेतकऱ्याने शरीराला विद्युत तारा लपेटून आत्महत्या केलेली असणे, एवढी मोठी भीषण परिस्थिती राज्यात निर्माण झाली असताना शासनाने फक्त १९ हजार ६७ गावांमध्ये संभाव्य दुष्काळ जाहीर केला असला तरी त्याही पेक्षा जास्त गावांत दुष्काळ पडलेला असणे, सोयाबीन व कापूस उत्पादित झाला असून या पिकाला उत्पादन खर्चापेक्षाही बाजारात कमी भाव मिळत असल्याने नापिकी व कर्जाच्या ओझ्याखाली नैराश्याला तोंड देत असलेल्या शेतकऱ्याच्या कापूस व सोयाबीन या पिकाला व्यापारी तांत्रिक कारणे दाखवून हमी भावापेक्षाही कमी भावात खरेदी करीत असणे, कापसाची आधारभूत किंमत ६,५०० रुपयांची मागणी असताना मागील वर्षाच्या ४००० रुपयावरुन फक्त ४०५० रुपये एवढीच करण्यात येणे, तसेच अद्याप कापूस केंद्रेही सुरु करण्यात न येणे, अद्यापही शासनाने दुष्काळामध्ये सापडलेल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक पॅकेज घोषित केले नाही, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसदारांना किमान ५ लाख रुपये आर्थिक मदत, वीज बिल माफी, पीक कर्जावरील कर्ज माफी, दूध उत्पादक शेतकऱ्यांचे दुधाचे भाव न वाढविणे इत्यादी, दुष्काळावर मात करण्यासाठी आणि आत्महत्येचे सत्र रोखण्यासाठी कायमस्वरुपी योजना व पॅकेज जाहिर करण्यात

यावे, त्याबाबत करावयाची कायमस्वरुपी उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (दुपारी १२.१५ वाजता)

एक : **प्रश्नोत्तरे.**

दोन : **"आश्वासन समितीचा एकशे पंच्याऐंशी व एकशे शहाऐंशीवा" अहवाल सादर करणे.**

तीन : **"अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे."**

चार **राज्यसभेच्या महासचिवाकडून संविधान (एकशे एकविसावी सुधारणा) विधेयक, २०१४ यांसह संविधानाच्या सुधारणेच्या अनुसमर्थनार्थ आलेला संदेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

पाच : **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

सहा : **लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री. गुरुमुख जगवानी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मौ. कात्रज, जिल्हा पुणे येथील पुणे महानगरपालिकेच्या मालकीचा सर्व्हे क्रमांक ८ (जूना सर्व्हे क्र.७अ), हिस्सा क्र.१/२/१, हा अंदाजे ८००० चौ.मी. असलेला भुखंड दिनांक ७ मार्च, २००८ रोजीच्या नोंदणीकृत करार क्रमांक २५०२/२००८ नुसार पुणे महानगरपालिकेस श्री.अली जाफरी व इतर ६४ मालकांनी हस्तांतरीत विकास हक्क (TDR) च्या मोबदल्यात विकला असणे, परंतु सदर भुखंड त्याच ६४ मालकांनी श्री.अली जाफरी यांना दिनांक ६ एप्रिल, २०११ रोजीच्या नोंदणीकृत करार क्र.२९०१/२०११ अन्वये पुन्हा विकणे, ज्याअर्थी सदर भुखंड पुणे महानगरपालिकेस व श्री.जाफरी या दोघांना विकल्यामुळे फेरफार क्र.२१३४६, दिनांकित २७ जून, २००८ व फेरफार क्रमांक २४३२५ दिनांकित ९ ऑगस्ट, २०११ या मध्ये दोन वेगवगळ्या नावांची नोंद असणे, सदर बाब गंभीर असून एकाच भुखंडाची दोनदा विक्री केल्यामुळे प्रशासनाची झालेली फसवणूक, प्रशासनाकडे वारंवार निवेदन करुन देखील कार्यवाहीस होणारे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची सखोल चौकशी व त्या अनुषंगाने संबंधितांवर करावयाची कारवाई."

(२) **श्रीमती विद्या चव्हाण,** श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी **वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवलीसह आंबिवली, शहाड, टिटवाळा, आजदे, सोनारपाडा, नेवाळी, नेतीवली भागातील अनेक बांधकाम व्यावसायिकांनी (बिल्डर) १६ लाखात स्वतःचे घर अशी जाहिरात करणे, जाहिरातीत कर्जाची सोय आणि कमी

व्याज यांचे प्रलोभन दाखवून प्रत्येक सदनिक धारकांना स्वस्तातील घरांचे आकर्षण दाखवून सद्यस्थितीत जवळपास २०० लोकांची फसवूणक केल्याचे उघडकीस येणे, याशिवाय ठाणे जिल्ह्यातील अन्य भागात रुपये २ लाखामध्ये मिळणारे चाळीतील घरांचे आकर्षण दाखवून गरीब लोकांची मोठ्या प्रमाणात फसवणुक करण्यात येणे, याबाबत शासनाने नागरीकांना फसविणाऱ्या बांधकाम व्यवसायिकांची चौकशी करुन त्यांचेवर कडक कारवाई तसेच घराच्या आमिषाने पैसे दिलेल्या कुटुंबियांचे पैसे त्यांना परत मिळावेत म्हणून कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रीया."

(३) **डॉ. नीलम गोऱ्हे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"विदर्भातील नागपूरातील तब्बल ११ सहकारी पतसंस्था सन २००९ पासून बंद असल्याने ६० हजार ठेवीदार वाऱ्यावर असल्याची तक्रार ठेवीदार ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुसऱ्या आठवड्यात मा.राज्यपालांकडे करणे, या बंद पतसंस्थांमध्ये ५० कोटीच्यांवर रक्कम अडकली असताना शासनाच्या सहकार विभागाच्या तसेच पोलीसांच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी संबंधित पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या विरोधात अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न करणे, या प्रकरणी सन २०१० पासून आजतागायत सतत संबंधित अधिकाऱ्यांनी वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिल्यामुळे ठेवीदारांमध्ये निर्माण झालेले नैराश्येचे व चिंतेचे वातावरण, यासंदर्भात शासनाने तातडीने संबंधित सहकारी पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांवर कडक कारवाई करुन ठेवीदारांना त्यांची रक्कम परत मिळण्यासंदर्भात कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(४) **सर्वश्री.अमरसिंह पंडित,** सतीश चव्हाण, धनंजय मुंडे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मध्य गोदावरी खोऱ्यातील १८ टी.एम.सी पाणी वापराचा बृहत आराखडा मंजुरीस्तव प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असणे, प्रस्तावित आराखड्यातील प्रकल्पांना मंजुरी न मिळाल्यामुळे मध्य गोदावरी खोऱ्यातील पाणी आंध्रप्रदेशात वाहून जाणे, सतत दुष्काळ व टंचाईग्रस्त मराठवाड्यातील जनता या सिंचन प्रकल्पाकडे आस लावून असणे, मराठवाडयाचा सिंचन अनुशेष दिवसेंदिवस वाढत जाणे, बृहत

आराखडयातील प्रस्तावित २५० हेक्टरपेक्षा जास्त क्षमतेच्या प्रकल्पांना मान्यता देण्याचा ठराव मंत्रीमंडळाने करून मा.राज्यपालांकडे पाठविण्यात येणे, १८ टी.एम.सी बृहत आराखडयातील बीड जिल्ह्यातील प्रकल्प भुसंपादन व इतर बाबींसाठी किफायतशीर असणे, सदरहू पाणी अडविण्यासाठी मराठवाडयातील जनतेने तीव्र आंदोलनाची भूमिका घेणे, या भूमिकेकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे मराठवाडयातील विशेषत: मध्य गोदावरी खोऱ्यातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप,** शरद रणपिसे, संजय दत्त **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **परिवहन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"कळमेश्वर, ता. व जि. नागपूर येथील ३० गांवामध्ये अजूनही महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची एसटी पोहोचू शकली नसल्याने या गांवामधील नागरिकांना आजही शैक्षणिक व आरोग्य सुविधेसह दैनंदिन कामे करण्यासाठी खाजगी वाहतुकीवर अवलंबून रहावे लागणे, गाव तेथे एसटी हे एसटी महामंडळाचे ब्रीदवाक्य असूनही सदरहू विभागात एसटीची सेवा पुरविण्यास संबंधित एसटी आगार कमी पडत असणे, कळमेश्वर तालुक्यात मुलींचे स्वतंत्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय असूनही केवळ वाहतुकीच्या सुविधेअभावी या मुलींना उच्चशिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, एसटीच्या वाहतूक सुविधे अभावी नागरिकांची मोठ्या प्रमाणात होत असलेली गैरसोय यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, याप्रकरणी शासनाने त्वरीत करावयाची उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**सात : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**आठ : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा व उत्तर -**

**नऊ : शासकीय विधेयके :-**

**विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

**(१) सन २०१४ चे वि.स.वि क्रमांक ३० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०१४.**

**(२) सन २०१४ चे वि.स.वि क्रमांक ३३ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१४.**

दहा : **सर्वश्री माणिकराव ठाकरे,** सुनिल तटकरे, शरद रणपिसे, धनंजय मुंडे, संजय दत्त, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, प्रकाश बिनसाळे, चंद्रकांत रघुवंशी, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री राजेंद्र मुळक, किरण पावसकर, अनंत गाडगीळ, निरंजन डावखरे, रामहरी रुपनवर, अमरनाथ राजूरकर **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"राज्यात महिला, दलित, आदिवासी यांच्यावर दिवसेंदिवस वाढत जाणारे अत्याचार, महिलांवर रोजरोसपणे होत असलेले बलात्कार, मा.मुख्यमंत्री नागपूर निवासस्थाना समोरच कोळसा माफियाकडून झालेला गोळीबार, अहमदनगर जिल्ह्यातील जवखेड मध्ये मागासवर्गीय कुटूंबाची निर्घूण झालेली हत्या, राज्यात या अगोदरही गोंदिया जिल्ह्यात जमिनीच्या वादातून दलित तरुणाला जिवंत जाळण्यात येणे, औरंगाबाद मध्ये मातंग तरुणाला विहीरीत फेकणे, नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या अगोदर एका शिक्षिकेवर व आदिवासी महिलेवर सामुहिक बलात्काराची घडलेली घटना, याप्रकरणातील दोषींना अद्यापही अटक करण्यात न येणे, सिंदेवाही येथील दोन मुलींचे अपहरण करुन त्यांची राजस्थान मध्ये विक्री करणे, ब्रम्हपूरी येथील लहान मुलाचे अपहरण होणे, लैंगिक अत्याचार, या घोटाळ्यांमुळे सामान्य लोकांचे जीवन उध्दस्त होणे, राज्यात दर तीन मिनिटांनी महिलांवर विनयभंग, छेडछाड, बलात्काराच्या घटना घडत असणे, वर्ध्यातील रपेश मुळे नरबळी प्रकरण माणुसकीला काळीमा फासणारे असून राज्यात अंधश्रध्दा निर्मूलन करण्याकरिता अनेक कायदे असतानाही ही लाजिरवाणी घटना घडणे, राज्य शासनाकडून गुन्हेगारी प्रकरणातील आरोपींवर कारवाई करण्यास आलेले अपयश, त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेवर विपरित परिणाम होणे, याकडे राज्य शासनाचे अंकुश व लक्ष नसल्याने दिवसेंदिवस राजरोसपणे वाढत असलेले गुन्हे, परिणामी दलित, अल्पसंख्यांक, महिला वर्गात निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, राज्य शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अकरा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.जयवंतराव जाधव व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"यशवंत ग्राम समृध्दी योजनेसाठी सन २०१०-२०११ वर्षापासून राज्यातून वीस जिल्हा परिषदांचे रु.४२३.८७ कोटीचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असून गेल्या दोन वर्षापासून कोणत्याही जिल्हा परिषदेस निधी वितरण करण्यात न येणे, ग्रामीण

महाराष्ट्रामध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध होण्याकरीता यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून सतत होणारी मागणी, राज्यातील ग्रामीण भागातील विकासकामांसाठी अन्य कोणतीही योजना नसल्याने शासनाने यशवंत ग्रामसमृध्दी योजना पुर्ववत किंवा सुधारित करुन कार्यान्वित करण्याची आवश्यकता व याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.जयंत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पेण जि रायगड तालुक्यातील नियोजित वडखळ कोळवे रस्त्यासाठी सर्व्हे नं १५३ पैकी २,१५२, १५० पैकी ८,१५६ पैकी १ व २,१५७ पैकी ४, ७, ८ व १०, १६९, १५३ पैकी ४, ५, ७, मिळून ८७,३ क्षेत्र सन १९७० मध्ये संपादित करुन जमिनीचा अंतिम निवाडा दिनांक २४ जून, १९७० रोजी होणे, प्रत्यक्षात संपादित केलेली जागा नियोजित रस्त्यासाठी वापरात न येणे, संपादित केलेली जमीन नियोजित रस्त्यासाठी वापरात न आल्याने संबंधित जमीनधारकांनी जमिनी परत मिळणेबाबत मागणी करणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक ०१ जानेवारी, २०१३ अन्वये वा त्या सुमारास जमीन मालकांना वापरात न आलेल्या संपादित जमिनी परत करणेत याव्यात अशी मागणी करण्यात येणे, संबंधित शेतकऱ्यांनी सन २००६ पासून संपादित केलेल्या जमिनी वापरात येत नसल्याने मागणी करुनही ७ वर्षाचा कालावधी ओलांडून संबंधित शेतकऱ्यांना जमिनी परत न करणे, त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १० डिसेंबर, २०१४.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.